जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेस नोट क्रमांक :- **दिनांक - २६/०१/२०२६**

मुंब्रा पोलीस स्टेशन, अंमली पदार्थ विरोधी पथकाने २४ किलो २०० ग्रॅम गांजा या अंमली पदार्थाचे साठयासह दोन इसम व एका महिलेस दिवा परिसरातुन केली अटक.

----------ooo----------

मुंब्रा पोलीस स्टेशन, अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना अंमली पदार्थ विरोधी प्रभावी कारवाई करण्याच्या मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार असे मुंब्रा पोलीस ठाणे हद्दीतील दिवा परिसरात अंमली पदार्थ विरोधी गस्त करीत असताना पोहवा/६४५५ तुषार महाले यांना मिळालेल्या गोपनिय बातमीच्या अनुषंगाने दिनांक २४/०१/२०२६ रोजी दिवा पुर्व, मुंब्रा ता.जि. ठाणे या परिसरात छापा कारवाई दरम्यान अंमली पदार्थ खरेदी/विक्री करणारे आंतरराज्य टोळीत सक्रिय असलेले इसम नामे **१) गुड्डु गोविंदकुमार हलदार, वय २७ वर्षे, २) व्यंकटेश शिव पिरमर, वय ३५ वर्षे, ३) श्रीमती रुबीदेवी मुन्शी केवट, वय ३८ वर्षे,** सर्व दिवा पुर्व, मुंब्रा ता.जि.ठाणे यांचे रहाते घरी त्यांचे ताब्यातुन मानवी शरीरावर परिणाम करणारा **एकुण ६,०५,७००/- रु किंमतीचा एकुण २४ किलो २०० ग्रॅम वजनाचा गुंगीकारक प्रतिबंधीत गांजा** या अंमली पदार्थाचा साठा हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर बाबत **मुंब्रा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. ९२/२०२६ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)ii(क), २९ प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास मा.वरिष्ठांच्या आदेशाने पोलीस उप निरीक्षक/रामकृष्ण दळवी हे करीत असुन ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थाचे रॅकेट चालवणारी मोठी टोळी असण्याची शक्यता आहे.

मा.पोलीस आयुक्त श्री.आशुतोष डुंबरे सो, ठाणे शहर यांचे नेतृत्वाखाली मुंब्रा पोलीस स्टेशन एन. डी.पी.एस. पथकाने जानेवारी २०२४ ते आज पावेतो **९७१ सेवनाच्या कारवाई व ६० ताबा कारवाई करण्यात आल्या असुन त्यामध्ये ९८ आरोपींना गजाआड करण्यात आलेले आहे.** तसेच ताबा कारवाई दरम्यान एकुण ४८,५६,००,०००/- रु. (आठ्ठेचाळीस कोटी, छपन्न लाख रुपये) किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आलेले आहे. मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर अंमली पदार्थ विरोधी पथकामार्फत अंमली पदार्थाची विक्री व सेवन करणाऱ्या इसमांवर यापुढे देखील अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त साो श्री. आशुतोष डुंबरे, मा.पोलीस सह आयुक्त साो श्री.ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अपर पोलीस आयुक्त साो पश्चिम प्रादेशिक विभाग ठाणे शहर श्री.विनायक देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त साो परिमंडळ-१ ठाणे शहर श्री.सुभाष बुरसे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त साो कळवा विभाग ठाणे शहर श्रीमती प्रिया डमाळे, व मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली **पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री.नितीन पगार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. शरद कुंभार, पोलीस निरीक्षक श्री.राजु पाचोरकर, सपोनि/रोहीत केदार, सपोनि/गणेश जाधव, पोउपनिरी/रामकृष्ण दळवी, पोउनिरी/रविंद्र पाखरे, पोहवा/१३३० महेश महाले, पोहवा/३७३५ राजाराम शेगर, पोहवा/६४५५ तुषार महाले, पोशि/१५९९ प्रशांत घुले पोअं/७८६० प्रविण पाटील, पोशि/३१३० रोशन कदम, पोशि/३२८८ किशोर माने, पोशि/७७२५ नवनाथ थोरवे, पोशि/२७७७ बालाजी आगावणे,पोशि/२५७१ सागर महांगडे, पोशि/४६१९ निलेश वर्पे, पोशि/७६५५ सचिन पाटील, पोशि/८२५८ नवनाथ तेलंगे, पोशि/८२११ वसिम तडवी, पोशि/५९७४ सागर सपकाळे व मपोशि/२२१२४ साक्षी कुतळ** या पथकाने केलेली आहे.